# अंतिम सत्राच्या प्रात्यक्षिक परीक्षा आज

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम सत्रातील प्रात्यक्षिक परीक्षा आज, मंगळवारपासून सुरू होणार आहेत. नियमित विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षांची संख्या २२५ इतकी आहे. त्या ऑनलाईन पद्धतीने महाविद्यालयांकडून घेण्यात येणार आहेत. त्याबाबत शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून महाविद्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत.

राज्य शासनाच्या निर्देशानुसार कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखेच्या अंतिम सत्रातील लेखी परीक्षा दि. १ ऑक्टोबरपासून सुरु होणार आहेत. त्यापूर्वी या विद्याशाखांमधील अभ्यासक्रमांच्या प्रात्यक्षिक परीक्षा घेण्याचे निर्देश शासनाने विद्यापीठाला दिले आहेत. त्यानुसार मंगळवारपासून या परीक्षांची सुरुवात होईल. त्यादृष्टीने महाविद्यालयांनी तयारी केली. या परीक्षेसाठी विषयनिहाय विविध गुण आहेत. अभियांत्रिकी, फार्मसी, विधी (लॉ), आदी विद्याशाखांच्या महाविद्यालयांनी नियोजन केले आहे. अंतिम सत्राची परीक्षा देणारे एकूण ७५ हजार विद्यार्थी आहेत. त्यातील बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांची संख्या ३० हजार आहे. नियमित आणि बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांच्या मिळून एकत्रितपणे ५८० परीक्षा होतील. या परीक्षांबाबत आवश्यक त्या सूचना विद्यापीठ संलग्न महाविद्यालये आणि अधिविभागांना दिल्या आहेत. अंतिम सत्रातील बी. एस्सी. अभ्यासक्रमांच्या ९० टक्के प्रात्यक्षिक परीक्षा यापूर्वी झालेल्या आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी सोमवारी दिली.

## प्रकल्प, प्रयोगाची कृती सांगायची

काही महाविद्यालयांनी ऑनलाईन, तर बहुतांश महाविद्यालयांनी विद्यार्थ्याला दूरध्वनी करून परीक्षा घेण्याचे नियोजन केले. व्हर्च्युअल लॅब नसेल, प्रयोग अथवा करून दाखविणे शक्य नसल्यास विद्यार्थ्यांनी या परीक्षेत त्याची कृती व थेअरी सांगावयाची आहे

# ऑनलाईन प्रात्यक्षिक परीक्षा आजपासून सुरू

## बीएस्सी, एमएस्सी, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्रचा समावेश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मंगळवार (दि. १५) पासून अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन प्रात्यक्षिक, मौखिक परीक्षा प्रारंभ होणार आहे. महाविद्यालयस्तरावर बीएस्सी, एमएस्सी, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेण्यात येणार आहेत.




परीक्षा विभागाने अंतिम वर्ष शेवटचे सत्र व बॅकलॉगच्या परीक्षांच्या तारखा यापूर्वीच जाहीर केल्या आहेत. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक, मौखिक परीक्षा, प्रकल्प परीक्षा १५ ते ३० सप्टेंबर दरम्यान घेण्यात येणार आहेत. यूजीसी, राज्य सरकारच्या मार्गदर्शक सूचना आणि विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार परीक्षा घेण्याबाबत महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे.

### माहिती अद्ययावत करण्याची सूचना

परीक्षेला बसणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने त्यांचा स्वत:चा मोबाईल, ई-मेल आयडी महाविद्यालय, अधिविभागातर्फे विद्यापीठाच्या अधिकृत संगणक प्रणालीत १७सप्टेंबरपर्यंत अद्ययावत करणे आवश्यक आहे. महाविद्यालयांनी www.unishivaji.ac.in या विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील 'एक्झाम पोर्टल' लिंकवर विद्यार्थ्यांची माहिती संकलित करून अद्यायवत करावी, अशा सूचना परीक्षा विभागाने परिपत्रकाद्वारे महाविद्यालये, अधिविभागांना दिल्या आहेत.

विद्यापीठ कार्यक्षेत्रात बी.एस्सी. ची (१२०), पान ३ वर

# ऑनलाईन प्रात्यक्षिक परीक्षा आजपासून सुरू

(पान १ वरून) अभियांत्रिकी (३२), औषधनिर्माणशास्त्र (१८) यासह महाविद्यालय आणि विद्यापीठ अधिविभाग एम.स्सीचे विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. प्रात्यक्षिक व मौखिक परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना थेट महाविद्यालयात न बोलविता स्कायपी, झूम, मिटिंग ॲप यांसारख्या आयसीटी माध्यमांद्वारे तंत्रज्ञानाच्या मदतीने परीक्षा घेण्याची मूभा अधिविभाग प्रमुख, प्राचार्य यांना देण्यात आली आहे.

परीक्षा घेताना सध्या असणाऱ्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या कमाल गुणामध्ये कोणताही बदल करण्यात येऊ नये. विद्यार्थ्यांना देण्यात आलेले गुण संगणक प्रणालीत भरण्यासाठी विद्यापीठाकडून आवश्यक लिंक १५ सप्टेंबर ते १ ऑक्टोबरपर्यंत उपलब्ध करून देण्यात आली आहे. कोरोना साथीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर .पळसे यांनी केले आहे.

# पात्र उमेदवारांकडून तयारीला वेग

## शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदाची निवड प्रक्रिया

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरु पदासाठीच्या मुलाखतीच्या पहिल्या फेरीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची तयारी वेगाने सुरु आहे. निवड समितीसमोरील सादरीकरण दमदारपणे व्हावे, यासाठी तज्ज्ञांच्या भेटीगाठी त्यांच्याकडून सुरु झाल्या आहेत.

कुलगुरूपदासाठी १६९ जणांनी अर्ज केले होते. या अर्जांची छाननी झाल्यानंतर कुलगुरु शोध समितीने मुलाखतीच्या पहिल्या फेरीसाठी २५ जणांची नावे पक्की केली आहेत. त्यांच्या मुलाखती दि. २६ आणि २७ सप्टेंबर रोजी होणार आहेत.



या ऑनलाईन मुलाखतीसाठी निवड झालेल्या २५ जणांना प्रत्येकी एक तासाचा वेळ देण्यात आला आहे. त्यामध्ये त्यांना विद्यापीठाचे व्हिजन, स्वत:ची वाटचाल, आदींबाबतचे सादरीकरण करावयाचे आहे. या मुलाखतीपूर्वी त्यांना पदवी, पदव्युतर पदवीची प्रमाणपत्रे, नियुक्तीचे पत्र आणि कुलगुरुपदासाठी कसे पात्र आहात याबाबतची दोन पानांची माहिती, तीन व्यक्तींची संदर्भपत्रे, आदी कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

यापूर्वी कुलगुरुपदासाठी पात्र ठरलेले, मुलाखत देणाऱ्यासह या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या भेटीगाठी पात्र उमेदवारांकडून सुरु झाल्या आहेत. आवश्यक कागदपत्रांच्या प्रती जमा करण्याचे काम त्यांच्याकडून करण्यात येत आहे.